महाराष्ट्र शासन
जिल्हादंडाधिकारी कार्यालय जालना
प्रशासकीय इमारत सर्व्हे नं.488 जालना

दुरध्वनी क्रमांक 02482-225502
Website www.jalna.nic.in

फॅक्स क्र. 02482-225326
Email : rdcjalna@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-डेस्क-१/पोल-१/कावी-

दिनांक- १३.०८.२०२०

**वाचा-** १. साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
३. या कार्यालयाचे आदेशक्र२०२०/मशाका/जिनिका/आव्यक्र/कावी, दि.३०.०७.२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी,राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३.०३.२०२० अन्वये लागु करून खंड १,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्यान्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड १९) नियंत्रण आणण्यासाठी व प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

तसेच ज्याअर्थी, राज्यात (कोविड-१९) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे वाढत्या रुग्णसंख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने सुधारीत अधिसूचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी, जालना जिल्हयात नागरी आणि ग्रामीण भागात कोरोना बाधीत रुग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ व बाधीत रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेता आगामी काळात दिनांक १७.०५.२०२० ते १८.०८.२०२० रोजी साजरा होणारा बैलपोळा हा उत्सव सार्वजनिकरित्या साजरा न करणे बाबत माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र बिनवडे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जालना जिल्हयात दिनांक १७.०८.२०२० व १८.०८.२०२० रोजी साजरा होणारा बैलपोळा हा उत्सव सार्वजनिकरित्या साजरा न करणे बाबत आदेशीत करण्यात येत आहे. तसेच बैलांची जाहीर मिरवणूक काढण्यास प्रतिबंध करण्यात येत असून बैलांना मिरवणुकीने एकत्रितरित्या मंदिरे इत्यादी ठिकाणी नेण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. बैलपोळा हा सण सर्व शेतक-यांनी त्यांचे घरातच किंवा शेत, घराच्या परिसरात साजरा करणे बाबत आदेशीत करण्यात येत आहे.

उक्त आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था, अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ तसेच भारतीय दंडसंहिता १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल. सदर आदेशास पोलीस अधिक्षक,जालना व जिल्हा माहिती अधिकारी,जालना यांनी व्यापक स्वरुपात प्रसार माध्यमातुन प्रसिध्दी देऊन आवाहन करण्यात यावे.

सदर आदेश आज दिनांक १४/०८/२०२० रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

DISTRICT MAGISTRATE JALNA

स्वाक्षरित/-
(रविंद्र बिनवडे) भा.प्र.से
**जिल्हादंडाधिकारी जालना**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना
२. पोलीस अधिक्षक, जालना
३. उपविभागीय दंडाधिकारी,जालना /भोकरदन / परतुर / अंबड

(कृ

Scanned by CamScanner

४. सर्व तहलिसदार तथा तालुका दंडाधिकारी जालना/बदनापूर/भोकरदन/जाफ्राबाद/परतूर/मंठा/अंबड/घनसावंगी
५. मुख्याधिकारी, नगर परिषद जालना/भोकरदन/परतूर/अंबड
६. मुख्याधिकारी नगर पंचायत, बदनापूर/जाफ्राबाद/घनसावंगी/मंठा
७. जिल्हा माहिती अधिकारी,जालना

Rawt

(रविंद्र बिनवडे) भा.प्र.से

**जिल्हादंडाधिकारी जालना**

14/8/2020

Scanned by CamScanner